CNRNO.MHNG100002482022

| | |
| --- | --- |
| दाखल दिनांक | : १६.०२.२०२२ |
| नोंदणी दिनांक | : १६.०२.२०२२ |
| निकाल दिनांक | : १०.०३.२०२६ |
| कालावधी | : ०४ व. ००म. २२दि. |

## न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग,उमरेड, यांचे न्यायालय

(पीठासीन अधिकारी रा.भा. डोळे)

(पारित दिनांक १० मार्च २०२६ )

नियमित फौजदारी खटला क्र. १४/२०२२. निशाणी क्र. २५.

गुन्हा रजिस्टर क्र. ७१४/२०२१.

उमरेड पोलीस स्टेशन.

अभियोग पक्ष : महाराष्ट्र शासनतर्फे,
पोलीस ठाणे अधिकारी, उमरेड,
ता. उमरेड, जि. नागपुर.

सरकारतर्फे : **श्री. संदेश काठोके सहाय्यक सरकारी अभियोक्ता.**

.. विरुध्द ..

आरोपी : **जागेश्वर उर्फ शंकर किलनाके,**
**वय : ३०** वर्षे, **व्यवसाय :** ट्रक चालक,
**राहणार :** रेल्वे स्टेशन मागील झोपडपट्टी, मंगळवारी पेठ,
उमरेड, तह.उमरेड, जि.नागपुर.

आरोपीतर्फे : **विधीज्ञ श्री. आर. बी. भोम्बे.**

# न्यायनिर्णय

१.

| | | |
|---|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक | : | १७.१०.२०२१ |
| प्रथम खबर दिनांक | : | १७.१०.२०२१ |
| दोषारोप दाखल केल्याचा दिनांक | : | १६.०२.२०२२ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | : | २९.०४.२०२२ |
| पुरावा नोंदविण्यास सुरुवात केल्याचा दिनांक | : | १०.०३.२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी ठेवल्याचा दिनांक | : | ..... |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | : | १०.०३.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख असल्यास. | : | लागू नाही. |

२. आरोपीचा तपशील :

| आरोपींची रँक | आरोपींचे नावे | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचा तपशील | शिक्षा किंवा निर्दोष | शिक्षा कालावधी | खटला चालू असल्याच्या दरम्यान कारागृहात असल्याचा कालावधी, फौ.प्र.सं. कलम ४२८ साठी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | जागेश्वर उर्फ शंकर किलनाके | अटक केली नाही. | १६.०२.२०२२ | भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ४५२ व ५०६ अन्वये. | निर्दोष | निरंक | लागू नाही |

३. अभियोग पक्षाचे साक्षीदार/ बचाव पक्षाचे साक्षीदार/ न्यायालयाचे साक्षीदार असल्यास :

अ. अभियोग पक्षाचे साक्षीदार :

| रँक | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १. | रवी ईश्वर मांढरे/नि.क्र.१७/सा.क्र.१ | फिर्यादी |

| | | |
|---|---|---|
| २. | अरुण सरजेराव पाटील/नि.क्र.२०/सा.क्र.२ | पंच साक्षीदार |
| ३. | सचीन रतन मानकर/नि.क्र.२३/सा.क्र.३ | पंच साक्षीदार |

ब. **बचाव पक्षाचे साक्षीदार** : आरोपीने पुरावा दिला नाही.

क. **न्यायालयीन साक्षीदार** : निरंक.

४. **अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालय यांचे दस्तास निशाणी बाबत यादी** :

अ. **अभियोग पक्षाचे निशाणी** :

| अ.क्र. | दस्तावेज विवरण | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | रिपोर्ट व फिर्यादवरील सही | निशाणी क्र.१८ व १९ |
| २. | घटनास्थळ पंचनाम्यावरील सही | निशाणी क्र. २१ व २२ |

ब. **बचाव पक्षाचे निशाणी** : निरंक.

क. **न्यायालयाची निशाणी** :

| अ.क्र. | दस्तावेज विवरण | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | आरोपी यांचे फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम ३१३ अन्वयेचे निवेदन. | निशाणी क्र. २४ |

ड. **विशेष साहित्य** (**मटेरियल ऑब्जेक्ट**) : निरंक.

---

५. **अभियोग पक्षाचे म्हणणे थोडक्यात खालीलप्रमाणे आहे**.

६. फिर्यादी हे रेल्वे स्टेशन झोपडपट्टी उमरेड येथे राहातात. दि.१६.१०.२०२१ रोजीच्या रात्री ०९.०० वाजता ते दुर्गा विसर्जना करीता गेले होते.

तेव्हा संदीप भुरे व कैलास किन्नाके यांच्यात भाडण झाले. विसर्जन झाल्यावर फिर्यादी यांनी दोघांना समजाविले. दोघांचे भांडण मिटले.

७. दि.१७.१०.२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता ते घरात एकटेच झोपुन होते. घराचा दरवाजा उघडा होता. दुपारी १२.०० वाजेच्या दरम्यान जागेश्वर उर्फ शंकर कन्नाके, कैलासचा भाऊ हा त्यांच्या घरात दारु पिवुन आला. त्यांना शिव्या देत आला. ते घराबाहेर आले. लघुशंका केली व उभे राहीले असता. आरोपीने त्यांच्या हातात असलेल्या कोयत्याने, त्यांच्या डाव्या कानाच्या खाली मारला. त्यांनी वार पकडण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या उजव्या हाताच्या बोटाला जखम झाली व रक्त निघाले. आरोपी पळुन गेला. त्यांना अक्षय शिवणकर व अरुण पाटील हे सरकारी दवाखान्यात घेवुन गेले. म्हणुन त्यांनी फिर्याद दिली.

८. म्हणुन फिर्याद दाखल करण्यात आली. आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ४५२ व ५०४ अन्वये शिक्षेस पात्र गु.र.क्र. ७१४/२०२१ नोंदवून घेतला. तपासी अधिकारी यांनी घटनास्थळी जाऊन घटनास्थळ पंचनामा, जप्ती पत्रक तयार केले. वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले. तसेच साक्षीदारांचे जाब–जबाब नोंदविले आणि तपासाअंती आरोपींविरुध्द उक्त कलमान्वये शिक्षेस पात्र गुन्ह्याचा अंतिम अहवाल दाखल केला.

९. आरोपींविरुध्द माझे पुर्वाधिकारी यांनी दिनांक २९.०४.२०२२ रोजी भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ४५२ व ५०४ अन्वये शिक्षेस पात्र असलेला

आरोप निश्चीत नि.क्र. ०९ अन्वये करण्यात आला. आरोपीने नि.क्र.१० अन्वये गुन्हा कबुल नसल्याचे कथन करुन संपरिक्षेची मागणी केली. आरोपीने त्याच्या विरुध्द खोटी केस दाखल केलेली आहे, या आशयाचा बचाव घेतला, असे त्याच्या फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम ३१३ अन्वयेच्या निवेदनावरुन दिसून येते.

१०. अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता तसेच आरोपीपक्षातर्फे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील उपलब्ध पुरावा आणि गुन्ह्याचा तपशील पाहता, खालील मुद्दे माझे विचारार्थ निर्माण झाले. त्या प्रत्येक मुद्दयाचे निष्कर्ष मी नोंदविले असून, त्यांची कारणमिमांसा खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दिनांक १७.१०.२०२१ रोजी दुपारी १२.०० वा. रेल्वे स्टेशन उमरेड येथिल फिर्यादीच्या घरात कोयत्याने डाव्या कानाच्या खाली मारहाण केली व इच्छापुर्वक साधी दुखापती केले आणि याद्वारे आरोपीने भारतीय दंड विधान कलम ३२४ खाली शिक्षापात्र असलेला अपराध केला ? | ... **नाही** |
| २. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त तारीख, वेळी व ठिकाणी, आरोपीने हमला करण्याच्या उद्देशाने किंवा भिती घालण्याची पुर्व तयारी करुन गृहअतिक्रमण केले आणि याद्वारे आरोपीने भारतीय दंड विधान **कलम ४५२** खाली शिक्षापात्र असलेला अपराध केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | ... **नाही** |

| | | |
|---|---|---|
| ३. | अभियोग पक्ष असेही सिध्द करतो काय की, उपरोक्त नमुद तारीख, वेळी व ठिकाणी, आरोपीने, फिर्यादीस वाईट वाईट शिवीगाळ केली. जेणेकरुन त्यांचा क्रोध चढण्यास कारण होऊन तसे साधारण सर्व लोकांचा स्वस्थपणा मोडील अगर दुसरा एखादा अपराध करील हे माहित असून त्या इराद्याने फिर्यादी आणि त्यांचे परिवाराचा बुध्दीपूर्वक अपमान केला आणि याद्वारे आरोपीने भारतीय दंड विधान **कलम ५०४** खाली शिक्षापात्र असलेला अपराध केला, असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | **... नाही** |
| ४. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारण मिमांसा

**मुद्दे क्र. १ ते ३ साठी** :

**११.** वरील तिघ मुद्दे एकाच घटनेशी निगडीत असल्याने, ते एकत्रीत चर्चेसाठी घेण्यात आलेले आहेत.

**१२.** सा.क्र. १ हे फिर्यादी आहे. त्यांनी असे कथन केले की, ते अभियोग पक्षास फितुर झाले. त्यांना फितुर म्हणुन घोषीत केल्यानंतर सुध्दा त्यांनी अभियोग दाद दिली नाही. त्यांनी फक्त त्यांच्या रिपोर्ट व फिर्यादवरील सहया ओळखल्या. फितुर होण्याचे कारण म्हणजे त्यांच्यामधे आपसी समझोता झालेला आहे.

**१३.** साक्षीदार क्र.२ हे पंच साक्षीदार आहे. त्यांनी फक्त त्यांच्या सहया ओळखल्या. ते देखील अभियोग पक्षास फितुर झाले. त्यांना फितुर म्हणुन घोषीत केल्यानंतर सुद्धा त्यांनी अभियोग दाद दिली नाही.

**१४.** साक्षीदार क्र.३ हे जप्ती पंच साक्षीदार आहे. ते देखील अभियोग पक्षास फितुर झाले. त्यांना फितुर म्हणुन घोषीत केल्यानंतर सुद्धा त्यांनी अभियोग दाद दिली नाही.

**१५.** अभियोगपक्षाचे पुराव्याचे अवलोकन केले असता, तिन्ही साक्षीदार फितुर झाले. त्यास कारण म्हणजे त्यांच्यामधे आपसी समझोता झालेला आहे. फौजदारी खटल्यांमध्ये आरोपीवरील आरोप वाजवी संशयाच्या पलीकडे सिध्द झाले पाहिजेत, तो पर्यंत आरोपी निर्दोष आहेत हे गृहीतक आहे. प्रस्तुत खटल्यात अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांच्या तोंडी पुराव्याचा विचार करता, गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिर्यादीच्या घरात गृहअतिक्रमण केले, फिर्यादीस कोयत्याने मारहाण केली व शिवीगाळ केली, असे कोणतेही सबळ पुरावा अभियोगपक्ष सिध्द करु शकले नाही. आरोपींवरील दोषारोप सिध्द झाले नाहीत, म्हणून, मी मुद्दे क्र. १ व ३ चे उत्तर नकारार्थी देऊन प्रश्न क्र. ४ बाबत खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>: आदेश :</u>**

१. फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) अन्वये आरोपीस भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ४५२ व ५०४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्ह्यातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे जामीन खत आणि जात मुचलका रद्द करण्यात येत असून जमानतदारांस  मुक्त करण्यात येत आहे.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७(अ) अन्वये रुपये १५,०००/- (अक्षरी रुपये पंधरा हजार मात्र) चे वैयक्तिक बंधपत्र व तितक्याच रकमेचा मुचलका द्यावा.

४. जप्त मुद्देमाल लोखंडी पाईप व कपडे ईत्यादी वस्तु ह्या अपील कालावधी संपल्यानंतर नाश करण्यात याव्या. तसेच जप्त मुद्देमाल कोयता हा जिल्हाधिकारी नागपुर यांच्याकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावा.

**५. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधीघोषित करण्यात आला.**

RAJU BHASKAR DOLE
Judgment
Digitally signed by RAJU BHASKAR DOLE
Date: 2026.03.17 17:39:37 +0530

**उमरेड.** **(रा.भा. डोळे)**

**दिनांक : १०.०३.२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, उमरेड.**